**RNI No. MAHBIL /2009/40124**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

**वर्ष ११, अंक १२(७)]** **शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७** **[पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००**

**असाधारण क्रमांक ५०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XXXVIII OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MOTOR VEHICLES ACT, 1988, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८.**

**मोटार वाहन अधिनियम, १९८८ हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

सन १९८८ चा अधिनियम क्र.५९.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता मोटार वाहन अधिनियम, १९८८ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :–

**१.** (१) या अधिनियमास, मोटार वाहन (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९८८ चा अधिनियम क्र.५९ याच्या कलम ७० मधील सुधारणा.

**२.** मोटार वाहन अधिनियम, १९८८ महाराष्ट्र राज्यास लागू असताना याच्या कलम ७०, पोट-कलम (१) च्या खंड (ई) मधील " वाहने ठेवण्याच्या जागेची सोय " या मजकुराऐवजी " स्वतःच्या खाजगी जागेत वाहने ठेवण्यासाठी करण्यात आलेली सोय " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर येणारे पर्यटक लक्षात घेता मुंबई शहरामध्ये किमान ३.५ लाखांएवढी वाहने पर्यटकांसाठी व प्रवासी वाहतुकीसाठी उपलब्ध असून परिवहन खात्याने काही खास अटी घालून त्यांना परवाने दिले आहेत. अशा वाहनांना सफेद रंगाच्या नंबराची पाटी लावण्याची सक्ती आहे. त्यामुळे ही सेवा खाजगी प्रवासी सेवा असल्याचे लक्षात येते. अशा खाजगी वाहनांची संख्या लक्षात घेता मुंबई शहरामध्ये या गाड्या उभ्या करण्याची एक मोठी समस्या निर्माण झालेली असून अशा प्रकारच्या वाहनांना परवानगी देताना मात्र गाड्या स्वतःच्या मालकीच्या जागेवर उभ्या करण्याचे बंधन नसल्यामुळे या गाड्या सार्वजनिक जागेवर उभ्या करण्यात येतात. या वाहनांची संख्या लाखांच्या घरात असून मोठ्या प्रमाणावर वाहनांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या जास्त आहे. त्यांची व्यवस्थादेखील सार्वजनिक जागेवरच होत असते. परिणामी, एकंदर मुंबईमध्ये निर्माण झालेल्या अनेक समस्यांप्रमाणे ही देखील मोठी समस्या आहे. अशा प्रकारची वाहने ही मुंबईच्या पदपथावर उभी केल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होते. या सर्व बाबींचा विचार करता प्रवासी वाहतूक करणाऱ्या खाजगी वाहनांना परवानगी देताना त्यांची वाहने उभी करण्याकरिता स्वतःची जागा असण्याची अट घालणे आवश्यक झाले आहे.

वरील उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मोटार वाहन अधिनियम, १९८८ हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्याच्या कलम ७० मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ मे, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.